# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.08.2024** **वारःसोमवार**

---

1. पुण्यासह राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस; अनेक धरणातून पाण्याचा मोठा विसर्ग सुरू; नागरिकांना सतर्कतेचा इशारा
2. 98वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन दिल्लीमध्ये होणार
3. एसटी महामंडळातर्फे 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' हा अभिनव उपक्रम
4. ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं पुण्यात वृद्धापकाळानं निधन आणि
5. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत पुरुष हॉकीमध्ये भारताचा उपांत्य फेरीत प्रवेश

**<u>पुणे पाऊस</u>**

पुणे शहर आणि जिल्ह्याच्या काही भागाला काल पुन्हा जोरदार पावसानं झोडपून काढलं. दिवसभर पावसाची संततधार सुरू होती. संध्याकाळनंतर शहरातला पावसाचा जोर काहीसा कमी झाला; पण खडकवासला धरणसाखळी क्षेत्रात पावसाचा जोर कायम होता. धरणातून मुठा नदीमध्ये सकाळपासून टप्प्याटप्प्यानं पाण्याचा विसर्ग सुरू होता. सिंहगड रस्त्यावरील एकतानगर, निंबज नगर भागात सकाळपासूनच आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या होत्या. एकतानगर, निंबज नगरसह येरवड्यातील शांतीनगर, आदर्शनगर इथंही पाण्याची पातळी वाढल्यानं पुणे अग्निशमन दलानं या भागातील अनेक नागरिकांची सुखरूप सुटका केली. महापालिका आणि पीएमआरडीएची अग्निशमन वाहनं तीन बोटींसह अथक कार्यरत होती. तसंच या परिसरात लष्कराची तुकडीही तैनात करण्यात आली होती.

पुण्यात होत असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला सतर्क राहाण्याच्या सूचना दिल्या आहेत. नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवणे, निवारा, जेवणाची व्यवस्था करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत. उपमुख्यमंत्री आणि पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनीही पूरपरिस्थितीचा आढावा घेतला. वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

पिंपरी चिंचवड शहर तसंच धरण क्षेत्रातही संततधार पावसामुळे, धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला होता. पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत असल्यानं महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्षतेचे आदेश दिले आहेत. नदीकाठी बचाव यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. तसंच राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची तुकडीही सज्ज ठेवण्यात आली आहे. या पथकानं काल जुन्या सांगवी भागातील 40 नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवलं. संभाव्य पूरस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरातल्या विविध भागातल्या एक हजार नागरिकांना काल निवारा केंद्रात स्थलांतरित करण्यात आलं.

राज्याच्या अन्य जिल्ह्यांमध्येही जोरदार पाऊस सुरू असून अनेक धरणांच्या पाणीसाठ्यात वाढ झाल्यानं पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे नदी काठच्या गावातील नागरिकांना सतर्क राहण्याचा इशारा संबंधित जिल्हा प्रशासनानं दिला आहे.

मुंबई शहर आणि उपनगरातही काल जोरदार पाऊस झाला. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांपैकी 'हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशय' पूर्ण भरला. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व 7 तलावांमध्ये मिळून 89 टक्क्यापेक्षा जास्त जलसाठा झाला आहे.

पालघर जिल्ह्यात सततच्या पावसामुळे वैतरणा, पिंजाळ या नद्या दुथडी भरून वाहत असून या नद्यांनी इशारा पातळी ओलांडली आहे. तर धामणी धरण, वांद्री, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा धरण, कवडास बंधारा इत्यादी धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

नाशिक शहरासह जिल्ह्यातही काल मुसळधार पाऊस पडला. गंगापूरसह जिल्ह्यातल्या सर्वच धरणांच्या पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. त्र्यंबकेश्वर इथं गावात आणि मंदिरात पाणी शिरलं आहे; तर भाम धरणात पाण्याच्या विसर्गामुळे काकुस्ते गावात घरांमध्ये पाणी शिरलं आहे. या गावातल्या 22 कुटुंबांना अन्यत्र स्थलांतरीत केलं आहे. नाशिक शहरात रामकुंडाजवळ गोदावरी नदीला आलेल्या पुरात एक अभियंता पाण्यात वाहून गेला. तर सुरगाणा तालुक्यातली एक महिलाही नदीच्या पुरात वाहून गेली.

धुळे जिल्ह्यातल्या पांझरा नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे तसंच पांझरा, मालनगाव आणि जामखेडी प्रकल्पातून मोठ्या प्रमाणात पाणी आल्याने अक्कलपाडा धरणामध्ये पाण्याच्या साठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे निम्न पांझरा मध्यम प्रकल्पातून काल पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

अहमदनगर जिल्ह्यात भंडारदरा आणि निळवंडे पाणलोट क्षेत्रात जोरदार पावसामुळे धरणांमधल्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. दोन्ही धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

राज्याच्या विविध भागात आजही पावसाचा जोर कायम असेल. पुणे आणि सातारा जिल्ह्यांमध्ये तसंच कोकण आणि घाट माथ्यावर तुरळक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी जोरदार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

**साहित्य संमेलन**

98वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा दिल्लीमध्ये होणार आहे. दिल्लीच्या सरहद संस्थेकडे या संमेलनाचं यजमानपद असेल. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळानं काल मुंबई मराठी साहित्य संघात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला. या संमेलनासाठी सात संस्थांनी निमंत्रण दिलं होतं. त्यापैकी पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेची इचलकरंजी शाखा, मुंबईची नॅशनल लायब्ररी, आणि दिल्लीच्या सरहद या संस्थांना मंडळाच्या स्थळ निवड समितीनं भेट दिली होती. संमेलनासाठी जागा, निवास व्यवस्था, संस्थेचं मनुष्यबळ, पुस्तक प्रदर्शनाची जागा आदी मुद्द्यांचा विचार करून सरहद संस्थेची निवड केल्याची माहिती महामंडळानं दिली आहे.

**श्रावण एसटी**

श्रावण महिन्याचा प्रारंभ आजपासून, म्हणजे श्रावणी सोमवारपासून होत आहे. यानिमित्त राज्यातल्या ज्योतिर्लिंगांच्या विविध प्रमुख शिवमंदिरांसह ठीकठीकाणच्या शिव मंदिरांमध्ये भाविकांनी पहाटेपासून गर्दी केली आहे. दरम्यान, श्रावण महिन्यात एसटी महामंडळानं 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. महामंडळाच्या राज्यातल्या विविध आगारांमध्ये हा उपक्रम राबवला जाईल; या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक, आणि

महिलांना मोफत किंवा माफक दरात तीर्थाटनाचा आनंद घेता येईल. प्रवाशांनी या उपक्रमाचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असं आवाहन एसटी महामंडळानं केलं आहे.

**शोभना रानडे**

ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं काल सकाळी पुण्यात वृद्धापकाळानं निधन झालं. त्या 100 वर्षांच्या होत्या. शोभना रानडे यांनी निराधार महिला आणि मुलांसाठी समाजकार्य केलं. त्यांच्या या कार्याची दाखल घेऊन केंद्र सरकारनं 2011 मध्ये त्यांना पद्मभूषण सन्मान देऊन गौरवलं होतं. पुण्यात आगा खान पॅलेस इथं गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटी आणि महिला प्रशिक्षणासाठी एक संस्था स्थापन करण्यात त्यांनी मदत केली. बालग्राम महाराष्ट्र नावानं मुलांसाठी त्यांनी सुरू केलेल्या उपक्रमातून शेकडो अनाथ मुलांना आसरा मिळाला. गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटीच्या माध्यमातून गंगा वाचवा चळवळीतही शोभना रानडे यांचा सक्रीय सहभाग होता.

**ऑलिम्पिक**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये काल पुरुष हॉकीच्या उपांत्यपूर्व फेरीत भारतानं ब्रिटनचा पेनल्टी शूटआऊटमध्ये 4-2 अशा फरकानं पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. बॅडमिंटनमध्ये मात्र भारताच्या लक्ष्य सेनला उपांत्य फेरीत पराभवाचा सामना करावा लागला. महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेतही उपांत्यपूर्व फेरीत 75 किलो वजनी गटात लोव्हलीना बोर्गोहाइन हिचा पराभव झाला.

**क्रिकेट**

भारत आणि श्रीलंका यांच्यातील मर्यादित षटकांच्या क्रिकेट मालिकेतील दुसऱ्या सामन्यात काल यजमान श्रीलंकेनं भारताचा 32 धावांनी पराभव केला. श्रीलंकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत भारतीय संघाला 241 धावांचं लक्ष्य दिलं. या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघ 208 धावांत गारद झाला. या विजयानंतर श्रीलंकेनं मालिकेत 1-0 शी आघाडी घेतली आहे. मालिकेतला पहिला सामना बरोबरीत संपला होता.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.